# देगलूर महाविद्यालयात एड्स जनजागृती कार्यक्रम संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन 25/10/24

**देगलूर :** महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि उपजिल्हा रुग्णालय देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी एड्स जनजागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा.उत्तमकुमार कांबळे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून आरोग्य विभागाचे समुपदेशक कुमार,, रमेश जाधव हे उपस्थित होते.



आपल्या प्रमुख मार्गदर्शनात कुमार यांनी विद्यार्थ्यांना लैंगिक आरोग्याबाबत माहिती देऊन एड्स या आजारांबाबत समज -गैरसमज या अनुषंगाने मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. संग्राम पाटील व आभार डॉ.व्यंकट खंदकुरे यांनी मानले. या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय देबडे, प्रा.गणेश क्यादारे, प्रा. शिवचरण गुरुडे,डॉ. व्यंकट शेरीकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner